


# Printing Area®

Peer Reviewed International Multilingual Research Journal

Issue-86, Vol-02, February 2022

Editor

Dr.Bapu G.Gholap

www.vidyawarta.com

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

139

14) भारतातील हवामान बदल, परिणाम व उपाय
प्रा.डा. राजेश चिमनकर, ता.जि.–चंद्रपुर ||65

15) वस्त्र फॅशन एक अभ्यास
डॉ. गंगासागर तुळशीदास चोले, जि. कोल्हापूर ||68

16) प्रासंगिक व्यवस्थापन
प्रा. डॉ. सौ. माधुरी अरविंद देशमुख, बुलडाणा ||70

17) भारतीय राज्यघटनेची वैशिष्टये
प्रा.डॉ. दिनेश रा. हंगे, जि. जालना ||74

18) Study of Population In India
Dr. J. M. Kakde, Chandrapur ||76

19) साहित्य आणि संस्कृती : अनुबंध
डॉ. सी.डी. कांबळे, जि.सोलापूर ||82

20) भारतातील आरक्षण धोरणाची पार्श्वभूमी
प्राचार्य डॉ. सुभाष गवई & दिगांबर पंढरी मिसाळ, जि. वाशिम ||85

21) किशोरावस्थेत निरोगी जीवनाकरीता आहाराचे नियोजन व आहारात शाकाहाराचे महत्व
प्रा. अर्चना बाबाराव मोहोड (निसाळ), भंडारा ||88

22) साठोत्तरी आंबेडकरवादी मराठी कविता
मोरे पंडित किशनराव, जि. नांदेड ||95

23) भारतातील किरकोळ व्यापार क्षेत्रातील परकीय थेट गुंतवणूक धोरण समस्या आणि...
प्रा. डॉ. रामदास डी. मुकटे, हिंगोली ||97

24) २०२० सालच्या भारत देशाच्या कोरोना आजाराच्या लॉक डाउन काळात दैनिक ...
Mr. Dr. Mastud Pravin Machindra, Dist- Solapur, Mharashtra ||101

25) मृदुला गर्ग के उपन्यासों में चित्रित नारी
प्रा. डॉ. रत्नमाला धारबा धुळे (वानखेडे), जि. हिंगोली ||105

26) कुमाऊँ के प्रमुख कौतिक मेले व राजजात धार्मिक यात्राऐं एवं संस्कृति सरंक्षण ...
गजदीप कुमार आर्या, बागेश्वर (उत्तराखण्ड) ||108


www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com



Assistant Professor
Shivaji College Hingoli
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

148

दिले. तिने पुर्णत: वेगळी शब्दकळाही आणली. तसेच आंबेडकरवादी कवितेने समीक्षकांनाही तिने अस्वस्थ करुन सोडले. ''केवळ विध्वसंक, केवळ आरडा–ओरडा करणारी, अपशब्द वापरणारी कविता फार काळ टिकून राहणे शक्य नव्हते. पुढे–पुढे तर आंबेडकरवादी कवी एकमेकांचे अनुकरण करु लागले सुर्य आणि काळोख याच्या प्रतिमा आलटून–पालटून चे लागल्या एकलव्य कर्ण, शबुक यांच्या मिथकांचा नको तितका वापर होऊ लागला त्यामुळे आज लिहिली जाणारी आंबेडकरवादी कविता क्षीण वाटते आहे. त्याच बरोबर दलितपिडीतांना अंर्तमुख करुन विद्रोहालाच प्रवृत्त करण्याची तिची शक्तीही लूप्त होत चालली आहे. या मर्यादा असूनही आंबेडकरवादी कवितेची निर्मिती आज थांबलेली आहे असे म्हणता येणार नाही.

आंबेडकरवादी मराठी कविता हा प्रवाह उत्तरोत्तर अधिकाधिक समृध्द होत असून नव्या दमाच्या कवी–कवियित्रीची भर पडत आहे. हे कवी उद्याची समर्थ विद्रोही कविता घडवतील असा विश्वास वाटतो. संयमशिलता, स्त्रीमनाचा सूक्ष्म वेध घेण्याची क्षमता, आणि वेगळा स्वतंत्र रुपबंध इत्यादी वैशिष्यासह नव आंबेडकरवादी कविता साकारतांना दिसते. नवोदित कविच्या पिढीमध्ये महेंद्र भवरे, सुरेंद्र नाईक, बाबुराव कांबळे, प्रकाश जाधव, भगवान भोईर, माधव डहाळे, अरुण काळे इत्यादी अनेक कवी हा प्रवाह म्हणजे आंबेडकरवादी कविता मानवतेसाठी व मानवमुक्तीसाठी लढणारा प्रवाह आहे असे म्हणता येईल.

**संदर्भ ग्रंथ :–**


१. प्रकृती आणि प्रवृत्ती – डॉ. गंगाधर पानतावणे – स्वरुप प्रकाशन, एन.प्र. सिडको, औरंगाबाद.

२. डॉ. महेंद्र भवरे – जागतिकीकरणानंतरचे मराठी साहित्य–संपादक, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले प्रा. दत्ताभगत सायन पब्लिकेशन, पुणे.

३. आंबेडकरी विचार आणि साहित्य , अविनाश डोळस, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.

४. दलित कवितेतील नवे प्रवाह – महेंद्र भवरे, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर

५. दलित विद्रोह – अर्जुन डांगळे, लोकवाडमयगृह, मुंबई

६. साहित्याचा अन्वयार्थ – डॉ. नागनाथ कोत्तापले


**23**

# भारतातील किरकोंळ व्यापार क्षेत्रातील परकीय थेट गुंतवणूक धोरण समस्या आणि उपाय योजना


**प्रा. डॉ. रामदास डी. मुकटे**
शिवाजी महाविद्यालय, हिंगोली


**********

**प्रस्तावना**

देशाच्या आर्थिक विकासामध्ये परकीय थेट गुंतवणूक हा घटक अलीकडील काळात महत्त्वाचा घटक म्हणून ओळखले जात आहे. आर्थिक विकास साध्य करत असताना मूलभूत घटक म्हणून भांडू ला कडे बघितले जाते. ज्या वेळी देशातील भांडवलाची कमतरता निर्माण होते त्यावेळेला विकास साध्य करण्यासाठी मर्यादा निर्माण होतात. यातून मार्ग काढण्यासाठी एक उपाय म्हणून विदेशी थेट गुंतवणुकीचा पर्याय समोर आलेला आहे. भारतासारख्या विकसनशील आणि भांडवलाअभाव असणाऱ्या देशासाठी परकीय थेट गुंतवणूक हा घटक महत्त्वाचा ठरतो. जगामध्ये अनेक विकसित देशांनी सुद्धा परकीय थेट गुंतवणुकीचा पर्याय आर्थिक विकासामध्ये उपयोगात आणण्याचा दिसून येतो त्यामध्ये विकसित देश म्हणून आपण अमेरिकेकडे पाहतो या अमेरिकेमध्येही मोठ्या प्रमाणात विदेशी गुंतवणुकीत झाल्याची दिसून येते.या आधारावर अमेरिका विकसित राष्ट्र म्हणून समोर आले.

भारतीय अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी भारत सरकारने परकीय थेट गुंतवणुकीला प्राधान्य दिले आहे. भारतामध्ये परकीय गंगाजळीचा निर्माण झालेला अल्प साठा आणि अर्थव्यवस्थेचे डबघायची स्थिती अशा काळामध्ये जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांच्या दबावाखाली त्याकाळचे पंतप्रधान पी. व्ही.नरसिंहराव व अर्थमंत्री मनमोहन सिंग यांनी १९९१ च्या नवीन आर्थिक सुधारणेध्ये जागतिकीकरण,



Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

खाजगीकरण आणि उदारीकरण या धोरणाचा स्वीकार केला आहे. या आर्थिक धोरणापासून प्रामुख्याने भारतात परकीय थेट गुंतवणुकीसाठी भारतीय अर्थव्यवस्थेचे दरवाजे खुले करण्यात आले.

भारतीय अर्थव्यवस्थेतील बाजारपेठेचा विचार करता जागतिक स्तरावर एक महत्वपूर्ण बाजारपेठ म्हणून भारतीय बाजारपेठेकडे बघितले जाते. भारतीय अर्थव्यवस्थेतील गुंतवणुकीची संधी म्हणून विदेशी भांडवलदारांनी भारतीय अर्थव्यवस्थेत गुंतवणूक करण्यास प्राधान्य दिल्याचे दिसून येते,याचा परिणाम १९९१ नंतर भारतातील थेट विदेशी गुंतवणूक मध्ये वाढ झाल्याचे दिसते. अर्थव्यवस्थेमध्ये परकीय थेट गुंतवणूक ही औद्योग आणि व्यापार क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात होत आहे. व्यापार क्षेत्रामध्ये घाऊक व्यापार आणि किरकोळ व्यापार असे दोन प्रमुख प्रकार पडतात या दोन्ही व्यापारात विदेशी थेट परकीय गुंतवणुकीला भारत सरकारने खुले धोरण स्वीकारून परकीय गुंतवणुकीत वाढ होण्याच्या दृष्टिकोनातून प्रयत्न केला आहे.

**संशोधनाची आवश्यकता**

प्रस्तुत संशोधन निबंधामध्ये भारतीय अर्थव्यवस्थेतील किरकोळ व्यापार क्षेत्रात परकीय थेट गुंतवणुकीचे शासनाचे धोरण काय आहे? धोरणाचा परिणाम म्हणून परकीय थेट गुंतवणुकीचे प्राप्त झालेले लाभ आणि त्यामुळे निर्माण झालेल्या समस्या काय आहेत? समस्या दूर करण्यासाठी उपाय योजना आढावा घेण्याची आवश्यकता लक्षात घेऊन संशोधन केले आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१) किरकोळ व्यापार क्षेत्रातील परकीय थेट गुंतवणूक धोरणाचा आढावा घेणे.

२) किरकोळ व्यापार क्षेत्रात परकीय गुंतवणूक मुळे अर्थव्यवस्थेत प्राप्त झालेल्या लाभाचा अभ्यास करणे.

३) किरकोळ व्यापार क्षेत्रात परकीय गुंतवणुकीमुळे निर्माण झालेल्या समस्यांचा आढाव घेणे.

४) किरकोळ व्यापार क्षेत्रात परकीय गुंतवणुकीमुळे निर्माण झालेल्या समस्या दूर करण्याच्या उपाय योजनांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोध निबंध कार्यासाठी संशोधनाच्या दुय्यम पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे. त्यामध्ये संशोधन कार्यास संदर्भात उपलब्ध असलेली विविध संदर्भ ग्रंथ, मासिके त्याच बरोबर ऑनलाइन पद्धतीने विविध वेबसाईट व युट्युब या साधनांच्या आधारे माहिती संग्रहित करण्यात आली आहे.

**विषय विवेचन**

भारतीय अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी भारत सरकारने संबंधित नवीन धोरण जाहीर केले तेव्हापासून भारतात विशेषत: व्यापार क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होत आहे. भारत हि व्यापार क्षेत्रातील जगातील दुसऱ्या क्रमांकाची बाजारपेठ आहे. जगातील सर्वात विकसित देशाची नजर भारताच्या बाजारपेठेकडे आहे. भारतातील मध्यमवर्गीय ग्राहकांची संख्या मोठी आहे आणि त्यांची क्रयशक्ती अधिकअसल्यामुळे मोठ्या प्रमाणात व्यापार करणे फायद्याचे होते. जगातील देशांना भारतीय बाजारपेठ म्हणजे व्यापार क्षेत्रामध्ये उपलब्ध झालेली संधी आहे. या संधीचा लाभ प्रत्येक देश आपापल्या पद्धतीने घेण्याचा प्रयत्न करतो यातूनच परकीय गुंतवणूक व्यापार क्षेत्रामध्ये वाढ होत आहे. परकीय गुंतवणूक म्हणजे दोन विविध देशां अंतर्गत कंपन्यांना परस्परांच्या देशामध्ये गुंतवणूक करण्यासाठी संधी मिळणे होय. परकीय गुंतवणूक करण्यासाठी कंपनीला दुसर्या देशातील कंपनीचा कमीत कमी दहा टक्के शेअर्स खरेदी करणे आवश्यक असते. जर ५० टक्के पेक्षा जास्त म्हणजे ५१ टक्के शेअर्स खरेदी केल्यास पूर्वीच्या कंपनीची ओनर्स म्हणून नवीन कंपनी ओळखली जाते. भारतामध्ये किरकोळ क्षेत्रात विदेशी कंपन्यांकडून मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होत आहे. भारतात रिटेलक्षेत्राचा व्याप फार मोठा आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेत रिटेल क्षेत्राचा वाटा हा अंदाजे १५ टक्के आहे. त्याशिवाय देशाच्या अर्थव्यवस्थेत रिटेल क्षेत्राच्या माध्यमातून सरकारच्या कोट्यात दरवर्षी २५० कोटी डॉलर्स परकीय चलन येते.

फॉरेन डायरेक्ट इन्व्हेसमेंट (एफडीआय) म्हणजे, विदेशाची थेट गुंतवणूक. देशात तीन प्रकारच्या कंपन्या असतात. निखळ देशी भांडवल असलेल्या कंपन्या,



Shivaji College, Hingoli (seal)
Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

ISSN: 2394 5303 | Impact Factor 8.012(IIJIF) | Printing Area® Peer-Reviewed International Journal | February 2022 Issue-86, Vol-02 | 099

देशी भांडवलासोबत विदेशी भांडवल वापरणाऱ्या कंपन्या, व केवळ विदेशी भांडवल असणाऱ्या कंपन्या. आता ज्या मुद्यावर वाद सुरु आहे तो देशी कंपन्यासोबत विदेशी कंपन्यांच्या गुंतवणुकीच्या संदर्भात आहे. सरकारने विदेशी कंपन्यांना निम्यापेक्षा अधिक गुंतवणुकीला परवानगी दिली.

**किरकोळ व्यापार क्षेत्रातील परकीय थेट गुंतवणूक धोरण**

भारतामध्ये किरकोळ व्यापार क्षेत्रात विदेशी गुंतवणूक करण्यासाठी विदेशी गुंतवणुकीचे दोन भागात विभाजन करण्यात आलेले आहे.

**अ) एक—मुद्रा किरकोळ व्यापार**

ज्या किरकोळ विक्री च्या दुकानातून केवळ एकाच ब्रँडच्या म्हणजे एकाच उत्पादनाच्या वस्तूंची विक्री केली जाते त्यास एक—मुद्रा किरकोळ व्यापार असे म्हणतात. उदा. वुडलैंड,पिटर इंग्लंड, नोकिया मोबाईल इत्यादी अशा प्रत्येक उत्पादनाची स्वतंत्र शोरूम असते.नोकिया ही एक विदेशी कंपनी आहे. त्यांचा एक ब्रँड आहे. नोकियाने विदेशी गुंतवणूक केली म्हणजे सिंगल ब्रँड मध्ये गुंतवणूक केली, असे मानले जाते. एका वस्तूचे उत्पादन करा किंवा विक्री करा. त्याला सरकारचा विरोध नाही. एक—मुद्रा किंवा एकल व्यापार च्या संदर्भात २०१६ च्या धोरणानुसार १००% सुरुवातीच्या तीन वर्षा करिता गुंतवणुकीसाठी परवानगी देण्यात आली आहे यासाठी स्थानिक सरकारची परवानगी घेणे आवश्यक आहे.४

भारतीय उद्योगांना स्पर्धात्मक वातावरण उपलब्ध होऊन भारतीय वस्तूंना जागतिक बाजारपेठा उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने ही गुंतवणूकी संदर्भात बदल केला आहे.

**ब) बहु—मुद्रा किरकोळ व्यापार**

बहु—मुद्रा किरकोळ व्यापार म्हणजे एकाच ठिकाणी अनेक कंपनीच्या वस्तू विक्रीसाठी उपलब्ध केल्या जातात त्याला बहु—मुद्रा किरकोळ व्यापार म्हणतात. उदा.किराणा दुकान किंवा मोठे मॉल, इलेक्ट्रिकल्स दुकान वगैरे, भारत सरकारच्या वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाच्या औद्योगिक धोरण व संवर्धन विभागाने दिनांक २० सप्टेंबर २०१२ प्रेस नोट ५ नुसार सरकारने बहु—मुद्रा किरकोळ व्यापारामध्ये ५१ टक्केपर्यंत विदेशी गुंतवणूक परवानगी देण्याचे धोरण जाहीर केले. ५

अशा पद्धतीने भारत सरकारने भारतातील किरकोळ व्यापार क्षेत्रात परकी थेट गुंतवणुकीला चालना देण्याचे प्रयत्न केले आहेत.

**किरकोळ व्यापार क्षेत्रातील परकीय गुंतवणुकीमुळे प्राप्त झालेले लाभ**

१) भारतीय उद्योगांना त्यांच्या विकासाला चालना मिळाली.

२) भारतीय वस्तूंना जागतिक बाजारपेठ उपलब्ध झाली.

३) भारतातील औद्योगिक क्षेत्रा मध्ये वाढ झाली.

४) भारतीय औद्योगिक क्षेत्रात व बाजारपेठेतील स्पर्धात्मक वातावरण निर्मिती झाली.

५) भारतातील कृषी व हस्त उद्योग यांच्या वस्तू उत्पादनाला जागतिक बाजारपेठ उपलब्ध झाली.

६) भारतात मॉल अशा प्रकारच्या मार्केट ची निर्मिती झाली.

७) भारतीय अर्थव्यवस्थेतील भांडवलाची कमतरता काही प्रमाणात कमी झाली आहे.

८) अर्थव्यवस्थेत रोजगार क्षेत्रात वाढ झाली आहे.

९) एक मुद्रा व्यापार क्षेत्रामध्ये गुंतवणूक वाढल्यामुळे दर्जेदार, ब्रँडेड उत्पादनाची सुरुवात झाली.

१०) ग्राहकांना अनेक दर्जेदार उत्पादनाची उपलब्धता झाली.

वरील प्रमाणे किरकोळ व्यापार क्षेत्रातील परकीय गुंतवणुकीमुळे भारतीय अर्थव्यवस्थेत लाभ प्राप्त झाल्याचे दिसून येतात.

**किरकोळ व्यापार क्षेत्रात तील परकीय गुंतवणुकीमुळे निर्माण झालेल्या समस्या**

भारतीय अर्थव्यवस्थेत किरकोळ व्यापार क्षेत्रात परकीय थेट गुंतवणुकी मुळे कृषी,उद्योग आणि ग्राहक यांना काही प्रमाणामध्ये लाभ होत असल्याचे दिसून येतात. तरीही सध्य स्थिती अशी आहे की, भारतीय अर्थव्यवस्थेत किरकोळ व्यापार क्षेत्रातील थेट परकीय



Assistant Professor
Shivaji College Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

गुंतवणुकीमुळे अनेक समस्या निर्माण होत असल्याचे दिसून येतात त्यापैकी काही प्रमुख समस्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) व्यापार क्षेत्रात स्पर्धा वाढल्यामुळे विदेशी कंपन्यांचे वर्चस्व वाढेल.

२) वस्तूंच्या किमतीमध्ये वाढ होऊन ग्राहकांची फसवणूक होण्याची शक्यता आहे.

३) विदेशी गुंतवणूकदारांकडून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्यामुळे बेरोजगारीत वाढ होण्याची शक्यता आहे.

४) भारतात विदेशी कंपनी ना मिळणारा लाभ विदेशात पाठवला जाईल.

५) शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात त्यांच्या मालाच्या खरेदी संदर्भात फसवणूक होण्याची शक्यता आहे.

६) किरकोळ व्यापार क्षेत्रात विदेशी गुंतवणुकीमुळे छोटे व्यापारी बाजारपेठेतून बाहेर पडतील.

७) किरकोळ व्यापार क्षेत्र बहुराष्ट्रीय कंपन्यांची मक्तेदारी निर्माण होण्याची भीती निर्माण झाली आहे.

८) काही प्रमुख विकसित शहरांमध्ये विदेशी गुंतवणूकदार गुंतवणुकीस प्राधान्य देतील.

इत्यादी प्रकारच्या प्रमुख समस्या किरकोळ व्यापार क्षेत्रात थेट विदेशी गुंतवणुकीमुळे निर्माण होत असल्याचे दिसून येतात.

**भारतातील किरकोळ व्यापार क्षेत्रातील थेट विदेशी गुंतवणुकीची मध्ये निर्माण झालेल्या समस्या उपाय**

१) विदेशी गुंतवणुकीत होणारे प्रादेशिक असमतोलावर नियंत्रण ठेवण्यात यावे.

२) विदेशी गुंतवणुक देशातील सर्वच भागात व्हावी यासाठी पायाभूत सोयी--सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

३) विदेशी गुंतवणूकदारांची मक्तेदारी होणार नाही यावर नियंत्रण सरकारचे असावे.

४) गुंतवणूक करताना प्रादेशिक घटकांना महत्त्व दिले जावे.

५) भारतासारख्या मोठ्या लोकसंख्येच्या देशात गुंतवणुकीमुळे रोजगार निर्मिती निश्चितपणे होईल यावर लक्ष केंद्रित केले जावे.

६) असंघटित कृषी क्षेत्रावर विदेशी गुंतवणुकीचा विपरीत परिणाम होणार नाही याची काळजी घेतली जावी.

७) विदेशी व्यापाऱ्यांकडून ग्राहकांची पिळवणूक होणार नाही यासाठी कायद्यांची निर्मिती करावी.

इत्यादी प्रकारच्या प्रमुख उपाय योजना किरकोळ व्यापार क्षेत्रातील थेट विदेशी गुंतवणुकीच्या समस्यावर नियंत्रण ठेवू शकतील.

**संशोधनाची निष्कर्ष**

१) भारतासारख्या भांडवलाचा अभाव असणाऱ्या अर्थव्यवस्थेत किरकोळ क्षेत्रात थेट विदेशी गुंतवणूक आवश्यक असल्याचे दिसून येते.

२) विदेशी थेट गुंतवणुकीमुळे भारतातील किरकोळ व्यापारी क्षेत्रावर विदेशी गुंतवणूकदारांची मक्तेदारी निर्माण होईल हे निश्चितपणे सांगता येत नाही. कारण अनेक प्रकारचे नियम आणि अटी, शर्ती किरकोळ व्यापार धोरणातील विदेशी गुंतवणुकीसाठी आहेत.

३) अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी किरकोळ व्यापार क्षेत्रात विदेशी गुंतवणुकीच्या अस्तित्व अटळ आहे.

४) अमेरिकेसारख्या विकसित देशांनी थेट विदेशी गुंतवणुकीच्या मदतीने विकास साध्य केला आहे त्यामुळे भारतामध्येही हे शक्य आहे.

५) ग्राहक यांच्यासाठी अनेक प्रकारचे दर्जेदार उत्पादने उपलब्ध होतील.

इत्यादी प्रकारचे प्रमुख निष्कर्ष प्रस्तुत संशोधनाची सांगता येतात.

**सारांश**

भारतीय अर्थव्यवस्थेत किरकोळ व्यापार क्षेत्रामध्ये परकी थेट गुंतवणुकीचे धोरण स्वीकारलेले आहे. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत काही समस्या निर्माण होणे हे निश्चित आहे. परंतु केवळ समस्येवरच लक्ष केंद्रित न करता परकीय गुंतवणुकीची मुळे निर्माण होणारे लाभ त्यामुळे होणारा अर्थव्यवस्थेचा विकास लक्षात घेण्याची गरज आहे. कारण अनेक विकसित देशांनी ही परकीय थेट गुंतवणुकीच्या बळावर आपला विकास साध्य केला आहे.त्यामध्ये अमेरिका रशिया



Bhadekar
Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

इंग्लंड यासारखे देशांचा उल्लेख आपल्याला करता येईल. भारताच्या आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी आणि आर्थिक सुधारणांचा एक भाग म्हणून किरकोळ व्यापार क्षेत्रात थेट विदेशी गुंतवणुकीचा स्वीकार करणे योग्यच असेल हे या ठिकाणी सांगता येते.

## संदर्भ सूची


१) https://mr.vikaspedia.in

२) कित्ता

३) डी.डी.इंगळे,२०१६, भारतीय अर्थव्यवस्था, अरुणा प्रकाशन, लातूर पृष्ठ क्रमांक १३७

४) https://www.Pmindia.gov.in

५) उपरोक्त,संदर्भात क्रमांक ३, पृष्ठ क्र.१३८

- https://www.mpscacafemy.com
- https://www.bytesofindia.com
- https://pib.gov.in
- https://yojana.gov.in
- maharashtratimes.com
- एन.एल.चव्हाण,२०१५,भारतीय अर्थव्यवस्था, प्रशांत पब्लिकेशन,जळगाव


□□□

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

24

# २०२० सालच्या भारत देशाच्या कोरोना आजाराच्या लॉक डाउन काळात दैनिक दिव्य मराठी वृत्तपत्रात प्रकाशित झालेल्या व्यंगचित्रांचा अभ्यास


**Mr. Dr. Mastud Pravin Machindra**
Researcher,
BARSHI, Dist- Solapur, Mharashtra


**********


**अ. ॲबस्टॅक/संशोधन सारांश** — हे संशोधन २०२० सालच्या भारत देशात कोविड—१९ म्हणजेच कोरोना आजाराच्या काळात झालेल्या लॉक डाउन काळात दैनिक दिव्य मराठी या मराठी भाषीक वृत्तपत्रामध्ये जी व्यंगचित्रे प्रकाशित झाली त्यावर वाचकांची मते जाणून घेतली आहेत. सदर संशोधनामध्ये गूगल फॉर्म या ऑनलाईन फॉर्मचा वापर करून ऑनलाईन पध्दतीने वाचकांकडून माहिती संकलीत केली आहे. हे संशोधन पूर्ण करण्यासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. या संशोधनात बंदिस्त प्रश्नावली या साधनाचा उपयोग केला आहे. प्रश्नांवलीमध्ये वृत्तपत्रामध्ये प्रकाशित झालेल्या व्यंगचित्रांचा उपयोग करून व्यंगचित्र प्रश्नावली बनवण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करूण निष्कर्ष काढण्यात आले आहेत. यासाठी टक्केवारी या संख्याशास्त्राचा वापर करण्यात आला आहे.


**क. संशोधन शिर्षक**

२०२० सालच्या भारत देशाच्या कोरोना आजाराच्या लॉक डाउन काळात दैनिक दिव्य मराठी वृत्तपत्रात प्रकाशित झालेल्या व्यंगचित्रांचा अभ्यास.

**ख. प्रस्तावणा**

२०२० साली सर्व जगभर कोविड—१९ म्हणजेच कोरोना या महामारीने हाहाकार केला. या